महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१२/ब/१६ब
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :०६ फेब्रुवारी, २०१८

प्रति,
सहायक आयुक्त (मावक),
विभागीय आयुक्त कार्यालय,
कोकण भवन, रु.नं.२२७,दुसरा मजला,
सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४.

विषय : बिंदूनामावली नोंदवही पडताळणी करुन मिळणेबाबत.
संदर्भ : आपले पत्र क्र.मावक/कक्ष-१/बिं.ना.त.पदो/आ-१४२१/२०१८,
दि.९/१/२०१८

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रान्वये, आपण कोकण विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयाकडून दूरध्वनीद्वारे शासन पत्र दि.२९.१२.२०१७ च्या अनुषंगाने रिक्त पदे पदोन्नतीने भरण्यासाठी बिंदूनामावली नोंदवही पडताळणी करणेबाबत विचारणा करण्यात येत असल्याचे नमुद केले आहे. त्यानुसार पदोन्नतीची बिंदूनामावली नोंदवही तपासून द्यावी किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती या विभागास केली आहे.

२. याअनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.२७९७/२०१५ वर दि.४.८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने या कार्यासनाकडून दि.२९.१२.२०१७ च्या पत्रान्वये तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते, दि.२५.५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा मार्गदर्शनपर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. सबब, सदर वस्तुस्थिती विचारात घेता, सद्य:स्थितीत पदोन्नती कोट्याची बिंदूनामावली तपासणे उचित होणार नाही. त्यानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

(सु.ए. आंबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय,
कोकण भवन, नवी मुंबई - ४०० ६१४
९१२२
दिनांक :- 20 FEB 2018
कार्य - 86
मावक

F:\SANJAY 16 B(B)\सन 2018 LETTERS & NOTES\प्र.क्र.12-2018 सहा आयुक्त कोकण भवन.DOCX

मा. सचिव/संचालक/प्राचार्य
सर्व संलग्नीत महाविद्यालये/परिसंस्था

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
जा.क्र.विशेष कक्ष/All college/62
दि- 26 APR 2018

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे उपरोक्त क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र./१२/ब/१६ब, दि—०६/०२/२०१८ रोजीचे शासन पत्र आपणास आदेशान्वये अग्रेषित करण्यात येत आहे.

उपकुलसचिव